# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३८८/२०२४ दिनांक २२/११/२०२४

## प्रेस नोट

### "अग्नीशस्त्राने गोळीबार करुन खून करणाऱ्या व १६ वर्षापासून मिळून न आलेल्या आरोपीस भदोही, उत्तरप्रदेश येथुन अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.!!"

दिनांक :- १९/०१/२००९ रोजी आरपीआय युवा कार्यालय, आचोळे गांव, नालासोपारा पुर्व येथे फिर्यादी लालचंद जैस्वाल, मयत प्रविण प्रभाकर धुळे व साक्षीदर असे नमुद कार्यालयात बसले असताना आरोपी हे पांढरे रंगाचे इंन्डीवर गाडीमधुन येवुन गैरकायदयाची मंडळी व गर्दी करुन पुर्व वैमनस्यातुन मयत प्रविण धुळे यास कार्यालयाचे बाहेर बोलावुन हाताने, दगडाने, विटाने मारहाण करीत असताना फिर्यादी व साक्षीदार हे सोडविण्यास गेले असता त्यांनाही मारहाण करुन आरोपी सिकंदर इम्रान शेख व अनिल दुर्वी सिंग यांनी त्याचे जवळील पिस्टल मधुन मयत प्रविण धुळे याचे पोटावर, गळयावर गोळया घालुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन नालासोपारा पो.स्टे. गुन्हा नोद क्र. ३२/२००९ भादविसक ३०२,१४४,१४७,१४८,१४९,३२३,१२०(ब) सह आर्म ॲक्ट कलम ३, २५(१)(क), २४(३) सह अनुसुचित जाती जमाती अधिनियम कायदा १९८९ चे कलम ३(२)(५) प्रमाणे दिनांक १९/०१/२००९ रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाच्या तपासात सन २०११ पावेतो १२ आरोपीतांना अटक करुन त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते परंतु पाहीजे आरोपी नामे झुरी ऊर्फ विनोद सिंह हा गुन्हा दाखल झाले पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता.

मा.वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत आदेशत केले होते. वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे झुरी ऊर्फ विनोद सिंह याचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १६ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा. शिवाजी पाटील, पोहवा. गोविंद केंद्रे असे तपास पथक तयार केले.

नमुद पोलीस पथकाने सदर गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणेतुन माहीती घेतली परंतु पाहीजे आरोपी याचे फक्त झुरी ऊर्फ विनोद सिंह नांव निष्पन्न होते. पाहीजेत आरोपीचे पुर्ण नांव, गांवाचा पत्ता व सद्याचा पत्ता मिळुन येत नव्हता. नमुद पोलीस पथकाने सलग २ महीने अहोरात्र परीश्रम घेवुन पाहीजे आरोपीचे गांव अछवर, थाना ज्ञानपुर, जनपद भदोही, उत्तरप्रदेश असे असल्याचे निष्पन्न केले. नमुद आरोपी हा त्याचे मुळ गांवी असल्याची शक्यता असल्याने लागलीच नमुद पोलीस पथक वरीष्ठांचे परवानगीने आरोपीचे मुळ गांवी जावुन स्थानिक पोलीस ठाणे तसेच गुप्त बातमीदार यांचे मार्फत माहीती घेतली असता नमुद पाहीजे आरोपी हा त्याचे गावात असल्याची माहीती प्राप्त झाल्याने ज्ञानपुर पोलीस ठाणे, भदोही, उत्तरप्रदेश या स्थानिक पोलीस ठाण्याचे मार्फत शिताफीने साफळा लावुन त्यास त्याचे राहते घरातुन दिनांक १८/१०/२०२४ रोजी १६.३५ वाजता शिताफिने ताब्यात घेतले.

Scanned with CamScanner

आरोपीस स्थानिक न्यायालयात हजर करुन ट्रान्झीस्ट रिमांड घेण्यात आले आहे. नमुद पाहीजे आरोपी विनोदकुमार बुधिराम सिंह ऊर्फ झुरी, वय-४६ वर्षे रा. अछवर थाना ज्ञानपुर, जनपद भदोही, उत्तरप्रदेश यास पुढील कारवाईकरीता नालासोपारा पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे. अशा प्रकारे गैरकायदयाची मंडळी जमवुन अग्नीशस्त्रानी गोळी झाडुन खुन करणाया पाहीजे आरोपीस १६ वर्षानंतर भदोही, उत्तरप्रदेश येथुन पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अविनाश अंबुरे व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनि हितेंन्द्र विचारे, सहापोउपनि श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, राजाराम काळे, संतोष मदने, सतिष जगताप, राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि. अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ. संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.




-----ooo-----

Scanned with CamScanner